# पालघर जिल्ह्यात युती नावापुरती !

## भाजप विरुद्ध शिवसेना थेट लढत; बविआला पुन्हा गड मिळवण्याची संधी

नितीन बोंबाडे

पालघर, दि. १६ - २०१४ विधानसभा निवडणूक, जिल्हा परिषद निवडणूक, पंचायत समिती निवडणूक, डहाणू नगर परिषद, जव्हार नगर परिषद, वाडा नगर पंचायत, डहाणू पंचायत समिती या निवडणुकीत भाजपकडून सेनेच्या उमेदवारांसमोर लढावे लागले आहे.

पालघर जिल्ह्यात लोकसभा निवडणूक सोडली तर विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, शिक्षक मतदार संघ या सर्व ठिकाणी पालघर जिल्ह्यात भाजप शिवसेना एकमेकांच्या विरुद्ध लढत आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यात दोन्ही पक्षांमध्ये युती नावापुरतीच दिसून आली आहे. प्रत्येक निवडणुकीत भाजप आणि सेना एकमेकांच्या विरुद्ध लढले आहेत.

पालघर जिल्हा परिषद बांधकाम सभापतीपद सेनेच्या हाताशी न लागू देता बहुजन विकास आघाडीला दिले. सेनेला देऊ केलेले समाजकल्याण सभापती पद ऐनवेळी भाजपने

### पालघर निवडणूक वार्तापत्र



काढून घेतले. पालघर जिल्हा परिषदेत अडीच वर्षांनंतर अध्यक्षपद देता आले असते तेही मिळवून दिले नाही.

डहाणू पंचायत समिती सभापती-उपसभापतीच्या निवडणुकीत भाजपने शिवसेनेला बाजूला ठेवले व बहुजन विकास आघाडीला देणे पसंत केले.

जिल्हा नियोजन निवडणुकीत भाजप सेनेकडे ९ मते असताना प्रकाश निकम यांना पाडून राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य निवडून दिले.

प्रकल्प स्तरीय कमिट्या, शासकीय कमिट्यांवर भाजपने शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची वर्णी लागू दिली नाही. ठिकठिकाणी उपसमित्या शिवसेनेला मिळू नये, अशा पद्धतीचा प्रयत्न केला. त्यामुळे शिवसेनेने वाडा नगरपंचायत, जव्हार नरपरिषद, विक्रमगड नगरपंचायत काबीज करून दाखवले. पालघर जिल्हा परिषदेत शिवसेनेला भाजपकडून मिळालेल्या वाईट वागणुकीमुळे शिवसेनेचे जिल्ह्यातील पदाधिकारी हतबल झाले आहेत.पालघर जिल्ह्यापुरता तरी युती तोडावी, अशी मागणी त्यांनी पक्षप्रमुखांकडे होत होती. पालघर लोकसभा पोटनिवडणुकीत त्याचे पडसाद पाहायला मिळाले आहेत.

युती झालेली तरी भाजपवर कुरघोडी करण्याची एकही संधी शिवसेना सोडत नाही. कसेही वागले तरी शिवसेना शेवटी आपल्याबरोबर येणार याची भाजपच्या नेत्यांना पक्की खात्री झाली आहे.

जिल्ह्यात युतीची सत्ता असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांत गरज भासल्यास इतर पक्षांच्या सहकार्याने आपल्याला पाहिजे तशी धोरणे भाजप राबवत आहे. पोटनिवडणुकीनंतर दोन्ही पक्षांमध्ये पुन्हा युती करण्याचे धोरण राबवले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात युती नावापुरती दिसून येत आहे.

# दादर दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासाठी गावकऱ्यांचे आमरण उपोषण

वार्ताहर

पेण, दि.१६ - भाताचे कोठार असणारे पेण तालुक्यातील दादर हे गाव १९८९ च्या महापुरानंतर दुष्काळग्रस्त जाहिर करण्याची मागणी दादरगावातील युवा नेते मोहन पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हाधिकारी रायगड, कोकण आयुक्त, प्रांताधिकारी, तहसीलदार पेण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. मात्र त्या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याने आपण सोमवार दिनांक २१ मेपासून शेकडो दादरकरांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती दादर गावचे युवा नेते मोहन पाटील यांनी दिली.

दादर हे गाव एककाळी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात असे. परंतु १९८९ च्या महापूरात गावाच्या सभोवताली असणारी बंदिस्ती वाहून गेल्याने सुमारे १२ हजार हेक्टर जमिनींत खारे पाणी शिरुन शेती नापिक झाली. तसेच गावांतील बरीच घरे वाहून गेली, मालमत्तेचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. आज या घटनेला २९ वर्षे पुर्ण होत आहेत. परंतु शासनाने मदतीचा हात दिलेला नाही. सध्या लहान-लहान होड्यांमधून वाळु काढणे, मच्छी काढणे व त्यावर आपली उपजीविका येथील ग्रामस्थांना करावी लागते. तर काही कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

GEECEE

**जीसी व्हेन्चर्स लिमिटेड**

(सीआयएन-एल२४२४९एमएच१९८४पीएलसी०३२१७०)
नों.कार्यालय:२०९-२१०, २ रा मजला, अर्काडिया बिल्डिंग, १९५, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१. दू.:(०२२) ६६७०८६००, फॅक्स : (०२२) ६६७०८६५०.
ई-मेल आयडी:geecee.investor@gcvl.in वेबसाईट : www.geeceeventures.com

**सूचना**

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन) च्या रेग्युलेसन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९ ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वर्ष अखेर व तिमाहीसाठी कंपनीच्या अलिप्त लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना अन्य बाबींसह विचारात घेऊन मंजूर करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार, २३ मे, २०१८ रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात होणार आहे.
सदर सूचना कंपनीची वेबसाईट http://www.geeceeventures.com/investor-relation/meetings-and-updates.aspx येथे पाहता येईल तसेच स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट http://www.bseindia.com व http://www.nseindia.com वर देखील पाहता येईल.
ह्याला अनुसरून कंपनीच्या "व्यापार नियमन, देखरेख आणि अहवाल संहिता" अन्वये कंपनीच्या शेअर्सचा व्यवहार करण्याकरिता ट्रेडिंग विंडो १६ मे, २०१८ पासून निकाल जाहीर झाल्यानंतर ४८ तास संपेपर्यंत बंद राहील.

जीसी व्हेंचर्स लिमिटेडसाठी
सही/-
दीपयंती कनोजीया
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : १६ मे, २०१८

**सर्वमंगल मर्कंटाईल कं. लि.**

सीआयएनः
एल५११००एमएच१९८३पीएलसी०२९६००
नोदंणीकृत कार्या.: क्र. २, मोहटा भवन प्रॉपर्टीज, डॉ. ई-मोजेस रोड लगत वरळी, मुंबई-४०० ०१८
ईमेलः info@sarvamangalmercantile.com
वेबसाईटः www.sarvamangalmercantile.com
दूरः ०२२-२४९६४६५६-६०
फॅक्सः ०२२-२४९६३०५५

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर्स रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९ (१) (ए) अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाची सभा, दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही आणि वित्तीय वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात व मंजूरीत करण्यासाठी बुधवार, ३० मे, २०१८ रोजी घेण्यात येणार आहे.
सदर सूचना कंपनीची वेबसाईट www.sarvamangalmercantile.com आणि स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com वर उपलब्ध असेल.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
सर्वमंगल मर्कंटाईल कं. लि. करिता
सही/-
संजय जैन
संचालक
(डीआयएन०००४७९७३)

दिनांकः १६.०५.२०१८
स्थळः मुंबई

ORICON ENTERPRISES LTD.

सीआयएनः
एल२८१००एमएच१९६८पीएलसी०१४१५६
नोदंणीकृत कार्यालयः १०७६ डॉ. ई मुस रोड वरली, मुंबई-४०० ०१८
वेबसाईटः www.oriconenterprise.com
ईमेलः share@ocl-india.com.com
दूरः ०२२-२४९६४६५६-६७,
फॅक्सः ०२२-२४९६३०५५

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर्स रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९(१) अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही आणि वित्तीय वर्षाकरिता एकत्रित आणिअलिप्त अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात आणि मंजूर करण्यासाठी बुधवार, ३० मे, २०१८ रोजी घेण्यात येणार आहे.
सदर सूचना कंपनीची वेबसाईट www.oriconenterprise.com आणि स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com यावरही उपलब्ध असेल.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
ऑरिकॉन एन्टरप्राइजेस लिमिटेड करिता
सही/-
संजय जैन
कंपनी सचिव

दिनांकः १६.०५.२०१८
स्थळः मुंबई